NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**



## परिपत्रक

संदर्भ : विद्यापीठाचे परिपत्रक क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२२/९४४३, दि.०८/१२/२०२२.

संदर्भीय परिपत्रकाद्वारे दि.०१ ऑगस्ट, २०२३ रोजी विद्यापीठ वर्धापनादिना निमित्त कार्यालयाची वेळ सकाळी ८:०० ते ११:३० पर्यंत राहील असे कळविण्यात आले होते.

या परिपत्रकाद्वारे सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, दि.०१ ऑगस्ट, २०२३ रोजी कार्यालयाची वेळ सकाळी ०७:३० ते १२:३० अशी राहील. विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांच्या शुभहस्ते सकाळी ०८:०० वा. विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजारोहन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

ध्वजवंदनानंतर विद्यापीठाचा १९ व्या वर्धापन दिनानिमित्त हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर येथे सकाळी ०९:०० वा. आयोजित विविध कार्यक्रमास मा. प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, मा. प्रभारी कुलगुरु प्रा. (डॉ.) राजनीश कामत हे अध्यक्ष पद भूषविणार आहेत. सदर कार्यक्रमास सर्व नियमित/कंत्राटी शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

सबब, सदर कार्यक्रमास सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व संकुलातील विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित राहावे.

(योगिनी घारे)
कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/२०२३/ 4757
दिनांक : 28 JUL 2023

प्रति,

१. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.

(१ ते ३ करिता) सदर परिपत्रक आपल्या विभाग/संकुलातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

४. विद्यापीठ संकेतस्थळ.